लोकमत

# हॅलो सातारा

सोमवार, दि. १६ सप्टेंबर २०१९

## वाणिज्य




शिवकृपा पतपेढीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना कृष्णा शेलार, शेजारी वसंतराव चव्हाण, चंद्रकांत वंजारी, अविनाश भोसले उपस्थित होते.

# शिवकृपा पतपेढीची लवकरच सात मजली इमारत : शेलार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोरेगाव :** 'कोरेगाव केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर गौरव झालेल्या शिवकृपा सहकारी पतपेढीने सभासद व ग्राहक हित डोळ्यासमोर ठेवून पारदर्शकपणे आणि लोकशाहीच्या पद्धतीने कामकाज केले आहे. पतपेढीची रबाळे (नवी मुंबई) येथे सातमजली अत्याधुनिक प्रशासकीय इमारत उभी राहत असून, नजीकच्या काळात ती पूर्णत्वास जाईल,' असा विश्वास अध्यक्ष कृष्णा शेलार यांनी व्यक्त केला.

पतपेढीच्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यस्थानावरून शेलार बोलत होते. व्यासपीठावर वसंतराव चव्हाण, संस्थापक-संचालक चंद्रकांत वंजारी, अविनाश भोसले, संचालक उपस्थित होते.

शेलार पुढे म्हणाले, 'पतपेढीचे २ लाख ६२ हजार ८५७ सभासद असून, मुख्य प्रशासकीय कार्यालयासह सात विभागीय आणि शंभर शाखा कार्यालये आहेत. पतपेढीच्या ४१ जागा स्वमालकीच्या जागेत असून, साताऱ्यातील पोवई नाका आणि ऐरोली (नवी मुंबई) या शाखांसाठी नवीन जागा खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

पतपेढीचा ३५२५ कोटी रुपयांचा संमिश्र व्यवसाय असून, १९९७ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. १५२८ कोटी रुपयांची कर्जे वाटप करण्यात आलेली आहेत. ३१ मार्च २०१९ अखेर २८ कोटी ८० लाख रुपयांचा भरघोस असा निव्वळ नफा झाला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत शेळके यांनी स्वागत केले. खेळीमेळीत झालेल्या सभेत विषयपत्रिकेवरील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.

माउली टेस्ट ट्यूब बेबी हॉस्पिटलात